# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव,जि.पुणे- ४१२ ४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२ ई मेल - gcoeara@gmail.com
फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ संकेतस्थळ - www.gcoeara.ac.in


जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२०/ 2442 दिनांक : 10/09/2020

## -: विद्यार्थ्यासाठी महत्वाची सुचना :-

**संदर्भ- १. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे यांचे परिपत्रक क्र.१०२ /२०२० दि. ०९/०९/२०२०**
**२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे यांचे विकल्प अर्ज भरण्यासंबंधी दि. ०९/०९/२०२० रोजीचे पत्र**

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात आल्याप्रमाणे महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये चतुर्थ वर्षात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २८/०८/ २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार, त्याअनुषंगाने मा. कुलपती तथा राज्यपाल यांच्या व महाराष्ट्र शासनाने दि. ०३/०९/२०२० रोजी सुचित केल्याप्रमाणे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे यांच्याकडून वरील संदर्भ पत्रान्वये सुचित केल्याप्रमाणे अंतिम सत्राच्या/ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (seminar) या परीक्षांचे नियोजन पुढीलप्रमाणे करण्यास कळविले आहे.

१. अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (seminar) परीक्षांचे आयोजन **दि. १५/०९/२०२० ते दि. २५/०९/२०२०** दरम्यान **Online** पध्दतीने उपलब्ध असलेल्या Google Meet,Microsoft Team, Zoom,WebEx,Telephone इत्यादी विविध पध्दतीने घेण्यात येणार आहे.
२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत (Backlog) परीक्षांचे नियोजन **दि. ०१/१०/२०२० ते दि. ०९/१०/२०२०** दरम्यान **Online/Offline** बहुपर्यायी प्रश्नाव्दारे **(MCQ)**, एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने करण्यात येईल. व त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.
३. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील नियमित परीक्षा **(Regular) परीक्षा दि.१०/१०/२०२० ते ३०/१०/२०२०** दरम्यान **Online/Offline** बहुपर्यायी प्रश्नाव्दारे **(MCQ)**, एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने करण्यात येईल. व त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.
४. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरीता विद्यापिठाने **Online** पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तथापी **Offline** पध्दतीनेही विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल. याबाबत विद्यापिठाच्या **संकेस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगीन आयडीवरून (Login Id) विकल्प अर्ज (Option Form)** उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.
५. **विद्यापिठाच्या संकेस्थळावर विद्यार्थी लॉगीन आयडीवरून (Login Id) Online/Offline परीक्षेसाठी विकल्प अर्ज(Option Form) भरण्याची शेवटची मुदत दि. १३/०९/२०२० पर्यंतच आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
अधिक माहीतीसाठी विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेले संदर्भ पत्राचे अवलोकन करावे. तसेच काही अडचणी असल्यास विभागप्रमुख/ महाविद्यालय परीक्षा अधिकारी /विषय शिक्षक/विद्यार्थी विभागाशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधावा.

डॉ. अ.शि.पंत
प्राचार्य
शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि.पुणे.

प्रत- माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
१.विभागप्रमुख-अनुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्वयंचल/स्थापत्य/यंत्र/उपयोजित वि./कर्मशाळा त्यांनी ही सुचना आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या What,s App ग्रुप वर त्वरीत पाठवावी.
२.डि. पी. यु. विभाग यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी.
३. श्री. डी. जे. परेरा सहाय्यक प्राध्यापक संगणक- यांनी सदर सुचना संस्थेच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रदर्शित करावी.
४. महाविद्यालय परीक्षा अधिकारी यांना माहीतीसाठी.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १०२/२०२०

**विषय : अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षांचे आयोजन करण्याबाबत.**

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार, त्यानुषंगाने मा.कुलपती तथा राज्यपाल यांच्या व महाराष्ट्र शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी सूचित केल्याप्रमाणे अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (Seminar) या परीक्षांच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१. अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या ज्या अभ्यासक्रमांचे प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्र (Seminar) परीक्षा यापूर्वी घेतल्या गेलेल्या नाहीत अथवा झालेल्या नाहीत, त्या सर्व परीक्षांचे आयोजन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० ते दिनांक २५ सप्टेंबर, २०२० दरम्यान Online पध्दतीने उपलब्ध असलेल्या Google Meet, Microsoft Team, Zoom, WebEx, Telephone इत्यादी विविध पध्दतीने आयोजित करण्यात यावेत. त्यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्डींग महाविद्यालयांमध्ये ठेवणे आवश्यक आहे. याबाबतचा अधिकचा तपशील संबंधित महाविद्यालये/संस्थांना त्यांच्या विद्यापीठाच्या अधिकृत मेल आयडीवर पाठविण्यात येईल. सदर परीक्षा संपन्न झाल्यानंतर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुरक्षित अंतर्गत गुण नोंदणी (Internal Marks Web Portal) या लिंकव्दारे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० पूर्वी करण्यात यावी.

२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत (Backlog) परीक्षांचे संभाव्य वेळापत्रकास मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मान्यता दिलेली असून, त्यांचे नियोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० दरम्यान Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने करण्यात येईल. त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.

३. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या नियमित (Reguler) परीक्षा दिनांक १० ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० दरम्यान Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.

४. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने Online पध्दतीने परीक्षा देणेची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तथापि offline पध्दतीनेही विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवरुन विकल्प अर्ज (Option Form) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा परीक्षा अधिकारी/विषय शिक्षक यांना आवाहन करण्यात येते की, सदरची बाब त्यांच्या महाविद्यालय/संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची व्यवस्था करावी व त्यांना यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन करावे.

(महेश काकडे)<br>
संचालक<br>
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/३५५<br>
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२०

प्रति,

१. मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग

२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/स्वायत्त संस्था, पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

समन्वय कक्ष (माध्यम)
गणेशखिंड, पुणे

Media Co-ordination Cell
Ganeshkhind, Pune-7

09 September 2020

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत अंतिम सत्र/ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षांबाबतचा विकल्प अर्ज उपलब्ध

## रविवार १३ सप्टेंबर २०२० पर्यंत विकल्प अर्ज भरण्याची मुदत

**पुणे, दिनांक ९ सप्टेंबर २०२० :**

अंतिम सत्र/वर्षातील पात्र विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाईन पध्द्तीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना ऑफलाईन पध्द्तीने सुद्धा परीक्षा देता येईल. याबाबत पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉग इन आय डी वरून विकल्प अर्ज (option form) उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विकल्प अर्ज भरण्याची मुदत रविवार १३ सप्टेंबर २०२० पर्यंत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार, मा. कुलपती तथा राज्यपाल यांच्या व महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३ सप्टेंबर, २०२० रोजी सूचित केल्याप्रमाणे अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षित/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (Seminar) या परीक्षांच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा देशभरातील व परदेशातील नावलौकिक व प्रतिष्ठा लक्षात घेऊन या विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रमांसाठी इतर राज्यातील तसेच परदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. सध्या कोव्हीड 19 चा प्रादुर्भाव लक्षात घेता अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने Online पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवरुन विकल्प अर्ज (Option Form) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या बाबतीत काही अडचणी असल्यास विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य तथा परीक्षा अधिकारी/विषय शिक्षक यांचेशी संपर्क साधावा.

तरी अंतिम सत्र/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत आवाहन करण्यात येते की, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या Online पध्दतीने परीक्षा देण्याचा अवलंब करुन परीक्षा द्यावी.

**परीक्षांबाबतचा विकल्प अर्ज विद्यार्थ्यांना पुढील लिंकवर उपलब्ध होईल :**

http://sps.unipune.ac.in/

---

अंतिम सत्र/वर्षातील पात्र विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाईन पध्द्तीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना ऑफलाईन पध्द्तीने सुद्धा परीक्षा देता येईल. याबाबत पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडी वरून विकल्प अर्ज (option form) उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करतोय की, प्रतिकूल परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात न घालता पालकांच्या सहकार्याने त्यांनी विकल्प अर्ज भरावा. विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या Online पध्दतीने परीक्षा देण्याचा अवलंब करुन परीक्षा द्यावी.

**- महेश काकडे,**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ